ब व क वर्ग नगर परिषदा व नगर पंचायती
क्षेत्राची निवडणूक प्रभागामध्ये विभागणी करणे

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १५ डिसेंबर, २००५.

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाच्या समक्रमांकाच्या दिनांक- ३ मे, २००५ च्या आदेशानुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे निवडणूक प्रभाग कसे पाडावेत याबद्दल स्पष्ट आदेश निर्गमित केले आहेत. त्या आदेशामध्ये असे नमूद केले आहे की, जर घरयादया उपलब्ध नसतील तर प्रगणक गट फोडू नये. परंतु, राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, ब वर्ग नगर परिषदा व क वर्ग नगर परिषदा तसेच नगर पंचायती यामध्ये काही अडचणी आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, ब वर्ग नगर परिषदा व क वर्ग नगर परिषदा तसेच नगर पंचायती यामध्ये प्रभाग रचना करताना प्रगणक गट फोडण्याशिवाय अन्य पर्याय नाही तेथे प्रगणक गट फोडण्याबद्दल परवानगी देणे अपरिहार्य आहे. परंतु, प्रगणक गट फोडताना जो प्रगणक गट फोडत आहे त्याचे सर्वेक्षण करण्यात यावे व त्या प्रगणक गटात जनगणना झाली त्यावेळी म्हणजे जानेवारी-२००१ मध्ये लोकसंख्येचे वितरण कसे होते हे जाणून घ्यावे. प्रगणक गट कमीत कमी फोडावयास लागतील याची काळजी घ्यावी.

२. प्रगणक गट फोडताना त्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण करणे व त्यानुसार २००१ च्या जनगणनेच्यावेळी असलेली लोकसंख्या कशी विभागली गेली आहे याचे प्रमाणपत्र सोबतच्या प्रपत्रात देणे आवश्यक आहे. त्या लोकसंख्येमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचीही लोकसंख्या नमूद करणेसुध्दा आवश्यक आहे. प्रगणक गट फोडण्यासंबंधीचे सर्वेक्षण करताना जानेवारी-२००१ मध्ये संबंधित माणसे दिलेल्या पत्त्यावर राहत होते यासंबंधी सर्व चौकशी करण्यात यावी. यासाठी इमारत कधी बांधण्यात आली आहे हा मुद्दादेखील अत्यंत महत्वाचा ठरतो.

३. ज्या नगर परिषदा किंवा नगर पंचायती यामध्ये प्रगणक गट फोडले जातील त्याबाबतची माहिती राज्य निवडणूक आयोगास, जरी क वर्ग नगर परिषद किंवा नगर पंचायत असली तरी पाठविण्यात यावी. मात्र, क वर्ग नगर परिषदा व नगर पंचायती यांच्या प्रभाग रचनेला मान्यता देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांकडेच राहतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
सर्व नगर परिषदांचे/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी

C:\Documents and Settings\PATIL\My Documents\aab-prabhag rachana aadesh.doc

## प्रपत्र- पाच

जनगणना प्रभाग क्रमांक ---------------------- पैकी प्रगणक गट क्रमांक ---------------
फोडणे आवश्यक ठरेल त्याची चौकशी करुन लोकसंख्या निश्चित केली त्याचा तपशील.

सर्वेक्षण केल्याची तारीख :-

| अ.क्र. | जनगणना घर क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नांव | १/१/२००१ ची लोकसंख्या | अनुसूचित जाती असल्यास लोकसंख्या | अनुसूचित जमाती असल्यास लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |
| एकूण... | | | | | |

| | एकूण | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|---|---|
| १. प्रगणक गटाची लोकसंख्या | | | |
| २. फोडलेल्या प्रगणक गटाचे सर्वेक्षण प्रमाणे निश्चित केलेली लोकसंख्या | (वजा) | | |
| ३. लगतच्या निवडणूक प्रभागांसाठी विचारात घ्यावयाची उर्वरित लोकसंख्या (वरील १-२) | | | |

मुख्याधिकारी,
नगर परिषद

जिल्हाधिकारी

C:\Documents and Settings\PATIL\My Documents\aab-prabhag rachana aadesh.doc